# गोदरेजची 'ऑटोव्हॉल्ट' सुविधा बुलढाणा बँकेत!

**मुंबई :** गोदरेज समूहाचा भाग असलेल्या गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने बँकिंग सुरक्षिततेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत 'ऑटोव्हॉल्ट' सुविधा प्रस्तुत केली आहे. अलीकडेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क येथे बुलढाणा नागरी सहकारी पतसंस्थेत या ऑटोव्हॉल्ट अर्थात स्वयंचलित सेफ डिपॉझिट लॉकर सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. बहुस्तरीय सुरक्षा प्रणालीने सज्ज असलेल्या ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना कोणत्याही त्रासाविना तसेच कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाविना आपला मौल्यवान ऐवज कोणत्याही वेळी उपलब्ध होऊ शकेल. ग्राहकाला आपले स्मार्ट/ॲक्सेस कार्ड स्वाइप केल्यावर लॉकर रूमपर्यंत पोहोचता येईल, त्यानंतर ग्राहक वैशिष्ट्यपूर्ण किल्ली वापरून वैयक्तिक लॉकर उघडू शकेल. सर्व प्रक्रिया स्वयंचलित असल्याने ग्राहकाला गोपनीयतेची पूर्ण हमी मिळते.